महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा - पालघर यांचे कार्यालय
(पुरवठा शाखा)
पार्श्वनाथ-९, बिडको नाका, ता. पालघर, जि. पालघर
दुरध्वनी क्रमांक-०२५२५-२९७०२४ ई-मेल : dsopalghar2014@gmail.com

क्रमांक -पुरवठा/का.१/टे.२/ई लिलाव/कावि/५६६/२०१६ दिनांक- २९/११/२०१६

**खरीप पणन हंगाम सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील खरेदी करण्यांत आलेल्या तथापि भरडाई विना शिल्लक धानाच्या विक्रीसाठी जाहीर ई-लिलावाची फेरसुचना.**

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पालघर जिल्हयात खरीप पणन हंगाम २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये खरेदी करण्यांत आलेल्या तथापि भरडाई विना शिल्लक असलेल्या धानाची विक्री ई-लिलावाद्वारे संबंधीत गोदामनिहाय " **जेथे आहे व जसे आहे** " या तत्वावर करावयाची आहे. यासाठी यापुर्वी दि. २०/०९/२०१६ रोजी http://eauction.gov.in या वेबसाईटवर ई-लिलाव सुचना अपलोड करण्यात आली होती. त्यानुसार मौजे - साखरे, ता. विक्रमगड येथील धानासाठी एकच लिलाव देकार प्राप्त झालेला होता. मौजे-कळंभे, ता. वाडा, जि. पालघर येथील धान साठ्याकरिता एकही लिलाव देकार प्राप्त झालेला नाही. त्यामुळे पारदर्शी, निकोप व स्पर्धायुक्त लिलाव प्रक्रिया पार पाडण्यासाठी पुनश्च ई-लिलाव प्रक्रियेच्या माध्यमातून धान खरेदी बाबत ई - लिलावाचे देकार मागविण्यांत येत आहेत.

**खरीप पणन हंगाम सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील भरडाई विना शिल्लक धानाच्या साठयाचा तपशिल पुढीलप्रमाणे.**

(आकडे क्विंटल मध्ये)

| अ.नं. | गोदामाचे नांव | खरीप पणन हंगाम | शिल्लक धान | ई-लिलाव दिनांक | ई-लिलावाची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | साखरे , ता.विक्रमगड , जि.पालघर | २०१२-२०१३ | १२४.९७ | १३/१२/२०१६ | स.१०.०० ते दु. ३.०० |
| २ | कळंभे, ता.वाडा , जि.पालघर | २०१३-२०१४ | ३७१.५० | १३/१२/२०१६ | स.१०.०० ते दु. ३.०० |
| | **एकूण** | | **४९६.४७** | | |

१. ई-लिलाव (E-Auction) प्रक्रियेसाठी सर्व इच्छुक निविदाकार /खरेदीदार/कंपनी/फर्म यांनी वैयक्तिक डिजिटल स्वाक्षरी सर्टिफिकेट (Digital Signature Certificate) काढणे आवश्यक आहे.
२. डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त करून घेऊन सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ च्या धानाच्या ई लिलाव (E-Auction) प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.
३. इच्छुक बोली बोलणाऱ्यांनी ई निविदेत विहीत मुदतीत भाग घेण्यासाठी http://eauction.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी (Online Registration) केलेले असावे आणि लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) चा जिल्हाधिकारी पालघर यांच्या नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष दिनांक ०९/१२/२०१६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, पालघर येथे समक्ष सादर करणे आवश्यक राहील.

**वरील ई-लिलाव प्रक्रियेसाठी पुढीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.**

| अ.क्रं. | कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि. ०१/१२/२०१६ ते दि. ०७/१२/२०१६ सायं. ५.३० वाजे पर्यंत | **ई लिलाव** (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी(Online Registration) करणे , राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाची प्रत, पॅन कार्ड, टॅन नंबर व रहिवासी पुरावा अपलोड करणे. |
| २ | दि. ०९/१२/२०१६ | **ई लिलाव** (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी केलेल्या निविदाकाराच्या अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र खरेदीदार ठरविणे. |
| ३ | दि. १३/१२/२०१६ | **ई लिलाव** वरील नमुद केलेल्या वेळेप्रमाणे करण्यांत येईल. |